स्थायी समितीच्या **मंगळवार** दिनांक 20–12–2011 रोजी सकाळी 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 3. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 4. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 5. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 6. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |
| 7. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |
| 8. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |
| 9. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |
| 10. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |
| 11. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 12. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 13. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |
| 14. | डॉ. मिलींद माने | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |
| 2. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 155 :</u>— वर्ष 2011—12 च्या वार्षिक अंदाज पत्रकीय भाष्यानुसार म.न.पा. मधे रक्तपेढी सुरु करण्याकरीता पी.पी.पी. प्रकल्पा अंतर्गत म.न.पा.चे दरातुन खाजगी अथवा स्वयंसेवी संस्थांचे माध्यमातून कमी शुल्कामधे रक्तपेढी चालविण्याकरीता दर मागविण्यात आलेले होते. त्यात इंदिरा गांधी रुग्णालय, म.न.पा. येथे रक्तपेढी सुविधा उपलब्ध करण्याकरिता मे. नंदकिशोर एजेन्सी, नाशिक यांचे दर कमी असून म.न.पा. साठी. —

1. रक्तदान दात्यासह Whole blood -Rs. 500/-, Platelete Concentrate - Rs. 350/-, Plasma - Rs. 350/-, Packed RBCs - Rs. 500/- हे दर व

2. विना रक्तदान दात्याकरीता Whole blood -Rs. 650/-, Platelete Concentrate - Rs. 500/-, Plasma - Rs. 500/-, Packed RBCs - Rs. 650/- हे दर राहतील.

करीता प्रकल्प राबविण्याकरिता मे. नंदकिशोर एजन्सी, नाशिक यांना रु. 1/— प्रती चौ. फुट दरानुसार जागा उलब्ध करुन देण्यास्तव व नमुद दरात प्रथम 10 वर्षाकरिता प्रकल्प राबविण्यास्तव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 156 :</u>— म.न.पा. हॉट मिक्स प्लॉन्ट करिता मेसर्स HPCL/IOCL/BPCL या राष्ट्रीय कृत कंपनी कडून डांबर खरेदी करण्याकरिता रु. 12497055/— चे प्रोर्फोरमा इन्हवाईस प्राप्त केले असून तो नस्तीत संलग्न आहे. रु. 12497055/— राशीचे अग्रिम टप्पा टप्याणे काढण्याचा प्रस्तावास प्रशासकीय माण्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 157 :</u>— वॉर्ड क्र. 130, दिघोरी दहन घाट येथे विविध विकास कामे व सौंदर्यीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त तीन निविदांपैकी मे. संतोष आर. खरपकर यांची प्राकलनीय दरापेक्षा 11.7 टक्के कमी दराची रु. 42,62,415/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 158 :</u>— चाचा नेहरु बालभवन कल्चरल हॉल चे निर्माण करण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 2,16,41,020/— चे प्रकलनास मान्यता प्रदान करण्याचा तसेच या कामास्तव वास्तुशिल्पकार मे. आर.डी. आर्किटेक्ट ॲण्ड कन्सल्टंट यांची म.न.पा. चे निर्धारित दरावर वास्तुठरावक सेवा घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन नियमाप्रमाणे लघुनिविदा काढण्याच्या अटीसह समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 159 :</u>– वॉर्ड क्र. 133, अयोध्यानगर येथील रस्त्याचे डांबरीकरणास्तव रु. 29,94,870/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 160 :</u>– डॉ. श्रीकांत जिचकार ट्राफीक पार्कची देखभाल व संचलनाकरीता मे. कृषी मित्र इरीगेंशन सर्हिसेस यांना देण्यात आलेला कंत्राट खालील अटीशर्तीवर पुढील 3 वर्षापर्यंत वाढविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 161 :</u>– नागपूर शहरातील सर्व जलकुंभावरील व्हॉल्व व झोन परिसरातील मुख्य व संवेदनशील व्हॉल्वचे खोलबंद करणे व त्याची निगा राखणे या संदर्भात कंत्राटाबाबत खालील नमूद प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1. नविन निविदाद्वारे दर व एजेन्सी निश्चित होऊन त्यानुसार हे काम दि. 01. 10.2011 रोजी सुरु झाल्यामुळे दि. 30.09.2011 तारखेपर्यंत पूर्वीच्या या कामाच्या कंत्राटास मुदतवाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. त्यानुसार दहाही झोनमध्ये दि. 01.04.2011 ते दिनांक 30.09.2011 पर्यंतच्या वाढीव कालावधीतील मंजूर दरांनूसार या कामाच्या रु. 65,21,022/– च्या खर्चास प्रशासकयी मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
3. या व्यतिरिक्त दोन झोन (आसीनगर व सतरंजीपूरा) मधील वाढीव कामाची आवश्यकता लक्षांत घेता दि. 01.04.2011 ते दिनांक 30.09.2011 पर्यंतच्या कालावधीकरीता मंजूर दरानुसार रु. 7,44,954/– च्या खर्चास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
4. वरील अनु क्रमांक 2 व 3 मधील बाबीवरील रु. 72,65,976/– चे अतिरिक्त खर्चासहीत या कामावरील रु. 5,00,82,469/– च्या एकुण सुधारीत खर्चास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 162:</u>– नागपूर शहरात प्रथमच नविन तंत्राचा वापर करुन कमी जाडीचे 25.96 कि.मी. चे एकूण 30 रस्ते रुपये 101.18 कोटीच्या सिमेंट कॉक्रिट रस्त्याचे काम करण्यात येत आहे.

निविदा अटी शर्ती क्र. A.10.5 व A.11.6 अन्वये proof consultant ची नियुक्ती करण्याची तरतूद आहे. करीता नामंत खालील शासकिय अनूसंधान संस्था/शैक्षणीक संस्था यांचे कडन विचारणा करण्यात आली.

1. V.N.I.T. Nagpur
2. CRRI, Delhi
3. IIT, Powai, Mumbai
4. S.V.N.I.T., Surat (Gujrat)

या मधील अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असलेले व न्युन्यतम तपासनी शुल्क रुपये 34 लक्ष (10.38% सर्विस टॅक्स वेगळा) असलेले सरदार वल्लभभाई राष्ट्रीय प्राद्योगिक संस्थान, सूरत यांची "proof consultan" म्हणून नियुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन proof consultan यांना शहरातील 30 रस्त्यांचे काम करुन घेण्याऐवजी, प्रस्तावित रस्त्यांपैकी फक्त आठ रस्त्यांच्या कामाचे proof consultan कडुन काम करुन घ्यावे, याचे भुगतान प्रस्तावित दराच्या प्रमाणात करण्यास (Proporitionate) करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 163</u>:– पोलिस लाईन टाकळी येथील तलावाचे सौंदर्यीकरण व विकास करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्रान्त निविदेमध्ये मे. दिप कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 11.17 टक्के कमी दराची रु. 25,50,675/– ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 164 </u>:– वार्ड क्र. 127 व 132 येथील शहनशाह चौक ते हुडकेश्वर रोडचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव दुसऱ्यांना निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदापैकी मे. मुकेश कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 8.91 टक्के अधिक दराची रु. 49,56,494/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा व सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 165 </u>:– नविन प्रशासकिय इमारतीच्या "Interior Work (Civil + Carpejntry) of New Administrative Building, at Civil Lines, NMC, Nagpur, या कामाकरिता बोलाविण्यात आलेल्या निविदा राशी रु. 7,02,32,881/– च्या कामाची निम्नतम निविदाकार M/s Woodfun यांची रुपये 6,62,99,840/– या रकमेची प्राकलनिय दरापेक्षा 5.6% कमी दराची निम्नतम निविदा स्विकार करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 166 </u>:– वार्ड नं. 79 मध्ये सुभाष रोड ते डालडा फॅक्टरी चौकापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. फोनेक्स इंजिनियरींग यांची प्राकलनीय दरापेक्षा 22.65 टक्के अधिक दराची रु. 33,89,985/– ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. मध्यंतरीच्या काळात सी.एस.आर. दर वाढल्यामुळे नविन दरानुसार सुधारित प्राकलन तयार करण्यात आलेले असुन प्राकलनिय राशी रु. 35,77,866/– आहे. या दरानुसार

कंत्राटदाराचे दराशी तुलना केली असता दर 5.25% नी कमी येतात. यानुसार उपलब्ध राशीपर्यंन्त नविन सी.एस.आर. दरानुसार सुधारित प्राकलन तयार करण्यात आले असता प्राकलन रु. 27,63,987/– चे येते.

करीता रु. 27,63,987/– चे सुधारित प्राकलनास मान्यता प्रदान करुन कंत्राटदाराची 22.65 टक्के अधिक दराची व नविन सी.एस.आर. दरापेक्षा 5.24% कमी दराची निम्नतम निविदा रु. 26,19,154/– मंजर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 167 :– मानकापूर रिंग रोड वर सादीकाबाद ते गोरेवाडा येथे प्रकाशव्यवस्था करण्याचे कामाकरीता मे. आर.सन्स, नागपूर यांची सर्वात कमी दराची प्राकलनीय रकमेच्या तुलनेत (रु. 42,26,756/–) 0.5% ने कमी असलेली रु. 42,05,622/– ची निम्नतम दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 168 :– नागपूर शहरातील एकुण 50 चौकातील ट्रॅफीक रोटरी व ट्रॅफीक आयलॅन्ड (Traffic Rotaties & Traffic island) चे विकास/सौदर्यीकरण व रखरखाव करण्याचे अटीवर जाहिरात करण्याकरीता बि.ओ.टी. तत्वावर देण्यास्तव मे. मिराज यांची ऑफसेट किंमतीपेक्षा जास्त असलेल्या रु. 21,00,000/– प्रती वर्ष चे निविदेस मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 169 :– नेहरुनगर झोन क्र.5 मधील एकात्मिक रस्ते सुधार योजनेअंतर्गत बांधकाम करण्यात आलेल्या रस्त्यांचे पॉटेहोल्स, दुरुस्ती, फुटपाथ दुरुस्ती व पूनर्डांबरीकरणाचे कामास्तव मे. एस.के.मेहता, यांची पाकलनीयन दरापेक्षा 23.55 टक्के अधिक दराची रु. 206.35 लक्ष राशीची निविदा मंजूर असून, सन 2008–09 व 2009–10 अंतर्गत उपलब्ध प्रावधान अनुक्रमे रु. 100.00 लक्ष व रु. 50.15 लक्ष असे एकूण रु. 150.15 लक्ष रकमेचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित कामास्तव रु. 56.20 लक्ष आवश्यक असून सन 2011–12 मध्ये उपलब्ध प्रावधान रु. 20 लक्ष रकमेचा कार्यादेश पद क्र. 370 अंतर्गत देण्यास्तव, प्रावधान उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 170 :– नागपूर महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लान्ट विभागाकरीता रस्ते बांधकाम साहित्य खरेदी करण्याच्या कामाकरीता एकूण प्राप्त सात निविदा पैकी मे. अल्ताफ अहमद व मे. एस.के.गुरुबक्षानी यांनी सादर केलेली प्राकलनिय दरांपेक्षा 0.5% ने कमी दराची प्राप्त झाली दोन्ही निविदाकाराचे दर सारखे प्राप्त झाल्यामुळे दोन्ही निविदाकारास समप्रमाणात विभागून (रु. 4459789.00 + रु. 4459789.00) = रु. 8919578.00 रक्कमेची निम्नत्तम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 171 :– वार्ड क्र. 15, के.टी. नगर येथील नक्षत्र रिक्रऐशनल ग्रांऊड च्या विकास कामाकरीता रु. 98.68 लक्षच्या रक्कमेच्या

कामास स्थायी समिती ठराव क्र. 129 दिनांक 14.11.2011 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने विविध कामाच्या निविदा मागविल्या असता प्राप्त निम्नत्तम निविदा खालील प्रामाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | निम्नत्तम निविदाकार | टक्के कमी / जास्त दर | निविदा राशी |
|---|---|---|---|---|
| 1 | विविध स्थापत्य कामे | मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन | 9% टक्के कमी | रु. 45,41,983/— |
| 2 | हार्टीकल्चरल कामे | मे.बी.टी. मैदमवार | 15.55% टक्के कमी | रु. 15,30,027/— |
| 3 | स्प्रिंकलर सिस्टीम | मे.कृषीमित्र इरिगेशन सर्व्हिसेस | 0.99%टक्के कमी | रु. 2,88,454/— |
| 4 | खेळणी लावणे | मे.एक्सेल फायब्रोटेक प्रा. लि. | 39.99% टक्के कमी | रु. 1,26,518/— |
| 5 | सॅण्ड स्टोन बेंचेस | मे.एस.जे. शर्मा | 16.01% टक्के कमी | रु. 1,31,024/— |
| | | | एकूण | रु. 66,18,006/— |

प्राप्त उपरोक्त निम्नत्तम निविदांना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 172 :— वार्ड क्र. 115 सी.आर.पी.एफ.कॅम्प ते शिवणगांव पर्यंन्त रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. एस.के.गुरुबक्षानी यांची प्राकलनीय दरापेक्षा 19.08 टक्के कमी दराची रु. 39,89,952/— ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 173 :— नागपूर शहरातील विविध जलकुंभावर Booster Chlorination करीता बसविण्यात आलेल्या Electro Chlorinators व D.G.Sets चे O & M चे काम M/s Nagpur Aquatech Pvt. Ltd., नागपूर यांना 1 वर्षाकरिता देण्यात आले होते. हया कंत्राटाची मुदत दि. 30.11.2011 ला संपली, तेव्हा सद्य कंत्राटास दि. 01.12.2011 पासून पुढील चार महिन्यांचे कालावधीकरिता ( 31.03. 2012 पर्यंत ) मुदतवाढ देण्यात व यावर मंजूर दराप्रमाणे येणाऱ्या रु. 27,88,892/— चे खर्चासह या कंत्राटावरील एकुण रु. 1,11,55,567/— ( 83,66,675 + 27,88,892 ) चे खर्चास मंजूर प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 174 :— वार्ड क्र.37, वैशाली नगर व मिलींद नगर येथील रस्त्यांचे रुंदीकरण , डांबरीकरण करणे व फुटपाथ बांधकामास्तव रु.

36,19,370/– रक्कमेच्या सुधारित प्राकलनास पद क्र. 681 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन , या कामास्तव प्राप्त 4 निविदांपैकी मे. डि.सी. गुरुबक्षानी , यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा वाटाघाटी व्दारे कमी करण्यात आलेली 14.65 प्रतिशम ने अधिक तर नविन सी.एस.आर पेक्षा 4.57 प्रतिशम ने कमी दरांची रु. 34,53,831/– रक्कमेची सुधारित निम्नतम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 175</u> :– नागपूर महानगरपालिकेच्या हद्यीतील लहान / मोठे नाले सफाई करण्याकरिता एक नग Chain Crawler Excavator ( 20 टन ) हे अधिकृत विक्रेता गदरे इंजिनिअरींग सर्विसेस यांच्या कडून 51,49,631 रुपयात खरेदी व एक नग Chain Crawler Excavator/ Dozer ( 5 टन ) हे अधिकृत विक्रेता डोझको ( इंडिया) प्रा. लिमिटेड यांच्या कडून 27,40,772 रुपयात खरेदी करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 176</u> :– महानगरपालिकेद्वारे नागपूर शहरात विविध ठिकाणी पादचारी पुलावर म.न.पा.च्या Outdoor Advertisement Policy प्रमाणे, उद्योजकाला Advt right देवून, पादचारी पुलांचे काम (DEFOT) Design, Build, Finance, Operate & Transfer 15 वर्षाकरिता म्हणजे खाजगीकरण तत्वावर करण्याचे प्रस्तावित आहे. खाजगीकरण तत्वावर पादचारी पुलाच्या कामाकरिता एकुण चार निविदा प्राप्त झाल्या. त्यात पॅकेज **अ** करिता 25.37 लक्ष पॅकेज **ब** करिता 20.00 लक्ष तसेच पॅकेज क. करिता 81.00 लक्ष अधिकतम इतके राशी दरवर्षी प्रमाणे म.न.पा. स.देण्याचे निविदाधारकांनी निविदेमध्ये स्विकृती प्रदान केलेली आहे. स्थायी समितीपुढे ठेवून निविदा स्विकृत करून निविदेस मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन स्थायी समितीच्या असे निर्दशनास आले की निविदा स्विकृत झाल्यावर निविदाकार दिलेल्या मुदतीत प्रस्तावित काम सुरु करीत नाही. करिता प्रस्तावित निविदेतील सर्व कंत्राटदाराकडून प्रस्तावित काम सुरु करण्याचे नियोजन, शपथपत्राद्वारे घेऊन पुन्हा हा विषय मंजुरी करिता स्थायी समिती समोर सादर करण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली तसेच खालील प्रस्तावित F.O.B. च्या निविदा काढण्याचा प्रस्ताव कार्यालयाने स्थायी समिती समोर सादर करण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. कॉटन मार्केट चौक
2. बैद्यनाथ चौक,
3. रघुजीनगर चौक,
4. पारडी नाका (जुना व नविन)
5. आंबेडकर गार्डन सी.ए. रोड
6. डागा हॉस्पीटल गेट

7. टॉऊन हॉल, महाल
8. ट्राफीक पार्क, धरमपेठ
9. जरीपटका रींगरस्ता जक्शंन
10. कोराडी रोड जक्शन
11. मानकापुर (नविन स्टेडीयम जवळ)
12. जकात नाका, वाडी
13. वाडी, MIDC जक्शंन
14. शेला कॉम्प्लेक्स
15. हिंगणा – MIDC जक्शंन
16. हिंगणा रिंगरोड जक्शंन
17. प्रतापनगर रिंगरोड जक्शंन
18. नरेंद्र नगर चौक
19. दिघोरी जक्शंन
20. सक्करदरा जक्शन
21. ताजबाग बस स्टॉप
22. राणी दुर्गावती चौक

<u>पदचारी पुल बांधण्याचे स्थळ खालील प्रमाणे</u>

| पॅकेज अ | पॅकेज ब | पॅकेज क |
|---|---|---|
| मेडीकल चौक | गांधी पुतला | जी.एस. कॉलेज/लॉ कॉलेज |
| राजीव गांधी चौक | अग्रेसन चौक | शंकरनगर चौक |
| छत्रपती चौक बस स्टॅन्ड | शहर बस स्टॅन्ड | मोर भवन |
| मीडास (लोकमत चौक) | मेयो हॉस्पिटल | हॉटेल नैवेद्यम |
| साई मंदिर | अजनी रेल्वे स्टे''ान | रिझर्व बँक चौक |
| खामला(सिंधी कॉलोनी) | एल. आय. सी. चौक | एस.एफ.एस. शाळा(गड्डीगोदाम) |
| रेशिमबाग चौक | मोहीनी कॉम्प्लेक्स | इंदोरा चौक |
| आकाशवाणी चौक | चिटणवीस पार्क चौक | आनंद भंडार (काटोल रोड) |

<u>ठराव क्रमांक 177</u> :– वार्ड क्र.10, येथील कुकरेजा नगर वस्तीत जि कुमार आरोग्यधाम ते चिराग अपार्टमेंट पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे रु. 31,19,536/– रकमेच्या सुधारित प्राकलनास पद क्र. 681 अंतर्गत

प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन, या कामास्तव प्राप्त 4 निविदांपैकी मे. फोनिक्स इंजिनिअरींग यांची मुळ प्राकलनिय दरांपेक्षा वाटाघाटी द्वारे कमी करण्यात आलेली 10 प्रतिशत ने अधिक तर नविन सी.एस.आर. पेक्षा 4.79 प्रतिशत ने कमी दरांची रु. 29,69,689/– रकमेची सुधारित निम्नत्तम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 178</u> :– वार्ड क्र.84, येथील रामनगर मैदान परिसरातील रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव रु. 35,87,850/– रकमेचे प्राकलनास पद क्र. 682 (अति.) अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन, या कामास्तव प्राप्त 4 निविदांपैकी मे. एस.के. गुरुबक्षानी, यांची सुधारित प्राकलनिय दरांपेक्षा 10.45 प्रतिशत ने कमी दरांची रु. 26,67,269/– रकमेची निम्नत्तम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 179</u> :– वार्ड नं. 88 मध्ये हम्पयार्ड रोड ते लोकमत चौकापर्यंन्त रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. फोनिक्स इंजिनियरींग यांची प्राकलनीय दरापेक्षा 22.85 टक्के अधिक दराची रु. 73,67,683/– ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. मध्यंतरीच्या काळात सी.एस.आर. दर वाढल्यामुळे नविन दरानुसार सुधारित प्राकलन तयार करण्यात आलेले असुन प्राकलनिय राशी रु. 74,30,625/– आहे. या दरानुसार कंत्राटदाराचे दराशी तुलना केली असता दर 0.847% नी कमी येतात.

करीता रु. 74,30,625/– चे सुधारित प्राकलनास मान्यता प्रदान करुन कंत्राटदाराची 22.85% टक्के अधिक दराची व नविन सी.एस.आर. दरापेक्षा 0.847% कमी दराची निम्मत्तम निविदा रु. 73,67,683/– मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 180</u> :– वार्ड नं. 14 मधील सौ. सुमनताई वासनिक परिचारिका महाविद्यालय, सुख–सागर ले–आऊट ते दाभा रोड पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास्तव रु. 32,66,525/– रकमेचे प्राकलनास पद क्र. 681 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन, या कामास्तव प्राप्त 4 निविदांपैकी मे. आर.एम.गोपलानी, यांची सुधारित प्राकलनिय दरांपेक्षा 5.95 प्रतिशन ने कमी दरांची रु. 31,15,807/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 181</u> :– वार्ड नं. 93 येथील बुधवार बाजार येथे लक्ष्मीदेवी बजाज हॉस्पिटल ते कमला नेहरु कॉलेज पर्यंत डांबरीकरणाचे कामास्तव रु. 39,94,185/– रकमेच्या प्राकलनास ठराव क्र. 141 दिनांक 25.11.2011 नुसार, पद क्र. 370 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन, या कामास्तव प्राप्त 2 निविदांपैकी मे.

डी.सी. गुरुबक्षानी, यांची प्राकलनिय दरांपेक्षा 5.65 प्रतिशत ने कमी दरांची रु. 37,68,339/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 182</u> :– वार्ड नं. 58,61 व 62 येथील दानागंज चौक ते कुंभार टोली चौक पर्यंतच्या रस्त्याचे पूनर्डांबरीकरणाचे कामास्तव रु. 48,74,205/– रकमेच्या प्राकलनास पद क्र. 370 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन, या कामास्तव प्राप्त 4 निविदांपैकी मे. एस.के.मेहता अॅन्ड कंपनी, यांची प्राकलनिय दरांपेक्षा 6.33 प्रतिशत ने कमी दरांची रु. 45,65,668/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 183</u> :– मंहैन्दीबाग/खैरीपुरा रेल्वे क्रॉसींग ते कांजी हाऊस चौकापर्यंत आय. आर.डी.पी. रस्त्याचे डांबरीकरणाचे रु. 49,90,530/– रकमेच्या प्राकलनास पद क्र. 370 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन, या कामास्तव प्राप्त 4 निविदांपैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची प्राकलनिय दरांपेक्षा 5.11 प्रतिशत ने कमी दरांची रु. 47,35,514/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 184</u> :– वॉर्ड क्र. 74,75 व 76 येथील बडकस चौक ते लाकडी पूल व चंद्रशेखर आझाद चौक ते लाकडीपूल व आयाचित मंदिर ते भोला गणेश चौक पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे रु. 89,63,321/– रकमेच्या प्राकलनास पद क्र. 370 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन, या कामास्तव प्राप्त 3 निविदांपैकी मे. आर.एम. दयारमानी यांची प्राकलनिय दरांपेक्षा 5.2 प्रतिशत ने कमी दरांची रु. 84,97,228/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 185</u> :– मनिषनगर येथील रेल्वे गेट चे रूंदीकरणास्तव सेंट्रल रेल्वे चे डिवीजनल इंजिनिअर यांनी त्यांचे पत्र क्र. NGP/W-178/LC/HQ/Wid.LC120 दिनांक 13.12.2011 नुसार अंदाजीत रू. 60.00 लक्ष चे खर्चास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 186</u> :– वार्ड क्र. ७०, नातीक चौक ते गणपती मंदिर (टिळक रोड) रोडचे डांबरीकरण आणि फुटपाथ बांधकामास्तव रू. २९,३६,४३०/– रकमेच्या प्राकलनास पद क्र. ३७० अंतर्गत स्थायी समीती ठराव क्र. १४१ दिनांक २५.११.२०११ नुसार कार्योत्तर प्रशासकीय मंजूरी प्रदान करून, या कामास्तव प्राप्त ४ निविदांपैकी मे. आर.एम. गोपलानी यांची प्राकलनिय दरांपेक्षा ०.५ प्रतिशत ने कमी दरांची रू. २९,२१,७४८/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 187</u> :– आशीनगर झोन अंतर्गत भिम चौक ते पाटनकर चौक पर्यंत रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव रू. ४०,००,०००/– रकमेच्या प्राकलनास पद क्र. ३७० अंतर्गत स्थायी समीती ठराव क्र. १४१ दिनांक २५.११.२०११ नुसार कार्योत्तर प्रशासकीय मंजूरी प्रदान करून, या कामास्तव प्राप्त ३ निविदांपैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची प्राकलनिय दरांपेक्षा ५.११ प्रतिशत ने कमी दरांची रू. ३७,९५,६००/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 188</u> :– रेशिमबाग, केशवद्वार ते गजानन चौका पर्यंत रस्त डांबरीकरणाचे कामास्तव रू. ३१,५९,२५६/– रकमेच्या प्राकलनास ठराव क्र. १४१ दिनाक २५.११.२०११ नुसार पद क्र. ३७० अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन या कामास्तव प्राप्त २ निविदांपैकी मे. डी.सी. गुरुबक्षानी, यांची प्राकलनिय दरांपेक्षा ५.६५ प्रतिशत ने कमी दरांची रू. २९,८०,५१७/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृतीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

अध्यक्षः– हॉटमिक्स प्लॉन्ट कडे येणा–या दोन ते अडीच महिन्याचा काय प्रोग्राम आहे.

श्री. होतवाणी(कार्य.अभियंता):– मा.अध्यक्ष महोदय, 12 मिटरवरचे रस्ते आहेत. 5 ते 10 टक्के गड्डे भरायचे राहून गेले आहे. झोन परिसरातील केले गेले तसेच अधिवेशनाचा काळ असल्यामुळे सिव्हिल लाईन एरियाचे केले गेले.

अध्यक्षः– अडीच महिन्याच्या काळात एक प्लॉनिंग लिस्ट स्थायी समिती तुमच्याकडे देणार आहे त्याप्रमाणे करण्यात यावे.

श्री. होतवाणी(कार्य.अभियंता):– मा.अध्यक्ष महोदय, आमच्याकडे चार गॅग आहेत. 5 ते 10 टक्के जे गड्डे राहून गेले त्याकरिता एक गॅग आमच्याकडे राहू दयावी. बाकी तीन गॅग जशी सूचना मिळेल त्याप्रमाणे पाठविण्यात येतील.

अध्यक्षः– उदयनगर येथे तसेच मा.सदस्य श्री. शरद बांते यांच्या घरासमोर मोठे गड्डे पडलेले आहे. हुडकेश्वर रस्त्याची फार वाईट स्थिती आहे. शहराच्या आतमध्ये येणारे पाईंटच्या रस्त्याची अत्यंत वाईट स्थिती आहे. या रस्त्यावरील पॅचेसचे काम करणे सुरू करण्यात यावे.

श्री.भुट्टोः– मा. अध्यक्ष महोदय, गितांजली टॉकीज के सामने 40 फुट का जो रस्ता उस तरफ ध्यान दिया जाता नही । आयआरडीपीचा रास्ता है, कॅडक रास्ता है, उस की फाईल गायकवाड साहब की तरफ है । इन रास्तो का डांबरीकरण करने का काम था, यह फाईल मंजुर हुयी है, इस की क्या स्थिती है । टेंडर मंजुर हो जाने के बाद काम हो जायेगा क्या?

अध्यक्षः– मागच्या बैठकीत सहा.आयुक्तांना एक सूचना दिली होती. गठई कामगारांना देण्यात येणा–या जागेची लिस्ट तयार झालेली आहे काय? झोनवाईज

तयार झालेली लिस्ट पाठविण्यात यावी. मागच्या तीन–चार बैठकीपासून कराडे साहेब बैठकीला येत नाही त्याबाबत त्यांना सांगण्यात यावे.

<u>ठराव क्रमांक 189</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

| | |
|---|---|
| निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर | अध्यक्ष<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर |